प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २२.१२.२०२०**

# सिडकोतर्फे घणसोली आणि नवीन पनवेल येथील निवासी, रो-हाउस, बंगलो भूखंड विक्रीकरिता उपलब्ध
# विकासक आणि सर्वसामान्य नागरिकांना सुवर्णसंधी

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील घणसोली येथे १२ आणि नवीन पनवेल (पूर्व) येथे १५ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. केवळ निवासी वापराकरिता उपलब्ध असलेल्या या भूखंडांवर यशस्वी होणाऱ्या अर्जदारांना बंगला, रो-हाउस, इमारत किंवा निवासी प्रकारातील, त्यांच्या मनासारखे घर बांधणे शक्य होणार आहे. या भूखंडांची विक्री ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेद्वारे होणार असून अन्य प्रक्रियाही ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. अर्जदारांच्या ऑनलाइन नोंदणीस २१ डिसेंबर २०२० पासून सुरुवात झाली आहे.

सदर योजने अंतर्गत नवी मुंबईतील घणसोली या विकसित नोडमध्ये सेक्टर-४ येथे एकूण १२ भूखंड व झपाट्याने विकसित होत असलेल्या नवीन पनवेल (पू.) नोड येथील सेक्टर-८ई, ९ई, ५ए(ई) आणि १२ई मधील एकूण १५ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध आहेत. सदर योजनेकरिता ई-निविदा प्रक्रियेस २८ डिसेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून सुरुवात होऊन १३ जानेवारी २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजता ही प्रक्रिया संपुष्टात येईल. तर ई-लिलाव प्रक्रियेस १४ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.० वाजता सुरुवात होऊन त्याच दिवशी म्हणजे १४ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ही प्रक्रिया संपुष्टात येईल. १५ जानेवारी २०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता या योजनेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती जसे, अनामत रक्कम, प्रक्रिया शुल्क, भूखंडांचे स्थान, दर इ. योजना पुस्तिकेमध्ये (scheme booklet) नमूद असून योजना पुस्तिका https://eauction.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मुंबई आणि ठाणे शहरापासून नजीकच्या अंतरावर असणारा घणसोली हा नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन सुविधा, नामांकित शिक्षण संस्था, आरोग्य सुविधा इ. पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असा नोड आहे. तर नवीन पनवेल हा नवी मुंबईतील झपाट्याने विकसित होणारा नोड असून सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कॉर्पोरेट पार्क यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हे पनवेल आणि नजीकच्या परिसरातच आकारास येणार आहेत. या सर्व बाबींचा विचार करता नागरिकांना नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरामध्ये त्यांच्या कल्पनेतील घर साकारण्याची सुवर्णसंधी या योजनेमुळे उपलब्ध झाली आहे. या योजनेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**